Spare

# महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लि.
# ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोकण परिमंडल, रत्नागिरी

ग्राहक तक्रार क्र. ०८/२००६
दिनांक : ११.०७.२००६

No 3627

14 SEP 2006

श्री. सुभाष वामनराव सावंत
वटमुख्यत्यारपत्रक धारक –कुळ वहिवाटदार विष्णू
सिताराम नागवेकर
मूळ मयत ग्राहक रमाबाई माधवराव सावंत
३४१३ अ, झाडगाव, मुरुग, रत्नागिरी

— तक्रारदार

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
विभागीय कार्यालय, रत्नागिरी

२) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
रत्नागिरी शहर, रत्नागिरी

— विरुध्द पक्षकार

<u>फोरम / उपस्थिती</u>
श्री. एस्. आर. खंडारे – सचिव सदस्य
श्री. एन्. ए. कुलकर्णी – सदस्य

<u>तक्रारदाराच्या वतीने</u>
श्री. सुभाष वामनराव सावंत (वटमुख्यत्यारपत्रधारक)

<u>विरुध्द पक्षकाराच्या वतीने</u>
श्री. एस्. जी. ढाकरे, कार्यकारी अभियंता,
विभागीय कार्यालय, रत्नागिरी
श्री. एच्. बी. जाधव, सहाय्यक लेखापाल
शहर उपविभाग रत्नागिरी

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल (ओम्बुड्समन) विनियम २००३ मधील ८.०२ चे तरतुदीनुसार तक्रारदार सुभाष वामनराव सावंत वटमुख्यत्यारपत्रधारक करीता मयत परवानाधारक रमाबाई माधवराव सावंत यांच्या कुळाच्या वतीने तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधीत तक्रार विहीत नमुन्यात आणि आवश्यक त्या कागदपत्रासह दाखल करण्यात आली आहे. वटमुख्यत्यारपत्रक धारक श्री. सावंत यांनी दि. २७.०८.०३ रोजी घेतलेल्या मुख्यत्यारपत्राची प्रत तक्रारीसोबत जोडलेली आहे. संबंधीत मुख्यत्यारपत्र विवाणी जागा संदर्भात असून दाखल झालेल्या तक्रारीच्या विषयाशी संबंधीत आहे. ग्राहकाची ही तक्रार सारास्थाने असून ग्राहक तक्रार

निवारण कक्ष यांच्याकडे दि. १२.०४.०६ रोजी तक्रार दाखल केल्यानंतर संबंधीत कक्षाकडून ०७.०६.०६ रोजी उत्तर पाठविल्यानंतर समाधान न झाल्याने तसेच तक्रारीचे निवारण न झाल्यामुळे संबंधीत श्री. सावंत यांनी मंचाकडे तक्रार दाखल केलेली आहे. दाखल करण्यात आलेली वेगवेगळी कागदपत्रे व लिखीत तपशील पहाता तक्रारीचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

संबंधीत परवानेधारक ग्राहक मयत रमाबाई माधवराव सावंत यांचे नाव मूळ घर ३४११ असून महसूल खात्यातील नोंदीनुसार मयत रमाबाई सावंत यांचे नावे असलेल्या रत्नागिरी शहर बिगर शेती प्लॉट स्वतंत्र असून त्याचा नगर भूमापन क्र. ६१ ब असा असून त्यामध्ये म्युन्सिपल घर नं. ३४११ – १९४६ पासून अस्तित्वात आहे. या मालमत्तेसंबंधात श्री. दिलीप शंकर तावडे ही आणखी एक संबंधीत व्यक्ती असून तावडे यांनी नवीन बांधलेल्या घराला नगर भूमापन सर्व्हे नं. १६०/१ हा स्वतंत्र असून नकाशाची प्रत आणि दोन्ही घरांची स्वतंत्र मालमत्ता पत्रके अर्जासोबत जोडलेली आहेत. वरील इमारतीतील मीटर आर ११७२ नवीन बांधकाम झाल्यानंतर शिफ्ट करण्यात आला आणि तो मूळ परवानेधारक ग्राहकाच्या नावे राहिला. तथापि, तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार काही कालावधीनंतर या मीटरचे मूळ नाव बदलण्यात आले की, ज्याकरीता संबंधीताने अर्ज केलेला नसताना विद्युत वितरण कंपनीच्या रत्नागिरी शहर १ या कार्यालयाने परस्पर हा बदल केला याची माहिती मिळण्यासाठी कार्यकारी अभियंता (प्रशासन) विद्युत वितरण कंपनी यांचे कार्यालयात २२.०७.०५ रोजी अर्ज करूनही अद्याप माहिती कळविलेली नाही.

याबरोबरच अर्जदाराच्या म्हणण्यानुसार मीटर आर २५७२ याच्या नेमक्या ठिकाणी विषयी संदिग्धता असून त्याची माहिती देण्यात आलेली आहे. तथापि, तक्रारदाराने सादर केलेल्या बीलानुसार मीटर आर २५७२ हा श्री. दिलीप शंकर तावडे, ३४९९ मुरूगवाडा या नावाने दाखल झालेला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार याची माहितीसुध्दा हेतूपूर्वक टाळण्यात आली असून यावरून असे सिध्द होते की, मीटर आर २५७२ – १९९६, ९७ पूर्वी म्युन्सिपल घर नं. ३४११ बसविण्यात आलेला नव्हता. या दोन्ही मीटर सोबतच याच जागेवर शेतीपंप कनेक्शन ११७१ कार्यान्वित असून याबाबतही शाखा अभियंता, शहर १ यांचे पत्र क्र. १२१४ दि. ११.०८.०५ नुसार कळविलेली माहिती आणि ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांचे पत्र क्र. २३३८ दि. ०७.०६.०६ रोजी कळविलेली माहिती या दोन्हीमध्ये तफावत असून याबाबतीतही निराकारण झालेले नाही. याबाबत पंप हाऊस आणि संबंधीत जागा हा तक्रारीचा विषय ठरलेला आहे.

तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार मयत रमाबाई सावंत तिचे नावे असलेला मीटर आर ११७२ व शेतीपंप कनेक्शन ११७१ यांचेबाबत श्री. दिलीप शंकर तावडे यांचा चुकीचा संबंध आणण्यात आला असून दि. १७.०५.०५ पासून ते दि. ०१.०२.०६ पर्यंत अनेक पत्रव्यवहार करूनही श्री. दिलीप शंकर तावडे यांचा या वीज कनेक्शनशी काहीही संबंध नसताना बेकायदेशीर व अखंड वीज पुरवठा चालू ठेवण्यात आलेला आहे. सदर जमिनीच्या मालमत्तेबाबत हक्क, वारस याबाबत कोर्टात प्रकरण चालू आहे आणि असे असतानाही श्री. दिलीप शंकर तावडे यांना अनधिकृतपणे वीज पुरवठा करण्यात आलेला आहे आणि त्यामुळे मूळ ग्राहकांच्या हक्काची पायमल्ली झाली असून मंडळाच्या कर्मचाऱ्याने चुकीच्या पध्दतीने जोडणी देऊन हा व्यवहार केल्याचे नमूद केलेले आहे. सदर जमिन/जागेत पूर्वीपासूनचा वीज पुरवठा हा रमाबाई माधवराव सावंत या नावाने असून त्यावरील मालकी हक्क संबंधीत वारसाचा आहे. वारस हक्क नसतानाही हे कनेक्शन श्री. दिलीप शंकर तावडे यांच्या नावाने वरील कनेक्शन दिले गेल्याने तक्रार प्रकरण उद्‌भवलेले आहे. या प्रकरणात ग्राहकांची तक्रार बेकायदेशीर कनेक्शन देण्यासाठी संबंधीत कर्मचाऱ्याची वर्तणूक जबाबदार असल्याचे नमूद केले आहे.

मंचाने पाठविलेल्या १४ जुलै २००६ च्या पत्राला उपकार्यकारी अभियंता, रत्नागिरी शहर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. ३६५० दि. २५.०६.०६ नुसार आपले स्पष्टीकरण दाखल केले असून त्यासोबत अनुषंगिक कागदपत्रे दाखल केली आहेत. सादर करण्यात आलेल्या पत्राचा आशय असा की, संबंधीत सर्व्हे नं. १६० आणि नगर भूमापन क्र. ६१ अ आणि ६१ ब जागेवरील बांधकामाबाबत रत्नागिरी नगर परिषदेने दिलीप शंकर तावडे यांना परवानगी दिली असून घर नं. ३४११ असा आहे. याबाबतची कर आकारणी पावतीही दाखल केली असून मालमत्तेवरील कराचा भरणाही केलेला आहे. मीटर क्र. ११७२

हा वरील जागेत असून वीज कनेक्शन मात्र मयत श्रीमती रमाबाई माधवराव सावंत यांचे नावे आहे. प्रत्यक्ष जागेची सध्याची मालकी (सर्व्हे नं. ३४११) दिलीप शंकर तावडे यांच्या नावाची आहे. वस्तुस्थितीनुसार प्रत्यक्षात आढळणारी तफावत शाखा अधिकारी यांच्याकडे विचारणा करूनही आम्हा याबाबत माहिती उपलब्ध झालेली नाही. मीटर क्र. २५७२ घर नं. ३४११ मध्येच ११.०७.७९ रोजी दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. शेती पंप कनेक्शन ११७१ बाबतही हीच संदिग्धता असून नेमकी वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात आलेली नाही. या पत्रातील मुद्दा क्र. ५ नुसार आरोही स्पष्ट करण्यात आले आहे की, ग्राहक हयात असो वा नसो या कनेक्शनचा वापर करणारे मूळ मालक जोपर्यंत नियमाप्रमाणे बदल करून घेत नाहीत तोपर्यंत कनेक्शन मूळ अर्जदाराच्या नावे वापरात राहते. संबंधीत उपकार्यकारी अभियंता यांच्या म्हणण्यानुसार नवीन वीज कनेक्शन क्र. आर. २५७२ दिलीप शंकर तावडे यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात करण्यात आले असल्यामुळे तावडे यांचा वीज पुरवठा अनधिकृत होऊ शकत नाही. संबंधीत तक्रारीबाबत असाही खुलासा करण्यात आला की, शेतीपंप कनेक्शन श्री. दिलीप शंकर तावडे यांच्या नावे करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावावर ११७१ बाबत श्री. विष्णू सिताराम नागवेकर यांनी हरकत दाखल केली असून या हरकतीस कार्यालयाने २२.०५.०६ रोजी पत्र पाठवून कायदेशीर हक्क शाबीत करण्याविषयी कागदपत्रे दाखल करण्यास सांगितली असता ती उपलब्ध करण्यात आलेली नाहीत. तथापि, दिलीप शंकर तावडे यांनी मीटर क्र. आर ११७२ व शेतीपंप कनेक्शन ११७१ या कनेक्शनच्या नावात बदल करणेबाबत प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कायदेशीर हक्काचा निर्णय लागेपर्यंत अन्य निर्णय घेता येत नसल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे. संबंधीत तक्रारदार कुळ वहिवाटदार यांनी सदरच्या कनेक्शबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून मालकी आणि वारस हक्काबाबत निर्णय लागलेला नाही.

सदर प्रकरणाची सुनावणी मंचाकडील नोटीस क्र. ३०३२ दि. २८.०७.०६ नुसार दि. ११ ऑगस्ट रोजी घेण्याचे निश्चित केले होते. पण परिसरातील जोरदार पाऊस व नैसर्गिक आपत्तीमुळे मंचाचे कामकाज घेता आले नाही. आणि त्यामुळे दि. ११.०८.०६ ची सुनावणी तहकूब करून ती पुन्हा ११ ऑगस्ट २००६ रोजी नोटीस काढून २२ ऑगस्ट २००६ रोजी घेण्यात आली. दि. २२.०८.०६ च्या सुनावणीत उभय बाजूनी आपला युक्तिवाद सादर केला. तक्रारदाराच्या वतीने वठमुखत्यारपत्रधारक सुभाष वामनराव सावंत उपस्थित राहून त्यांनी आपले लेखी म्हणणे पत्र दि. ११.०८.०६ नुसार दाखल करून, दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तसेच सुनावणी कालावधीत दाखल केलेल्या वेगवेगळया कागदपत्रांच्या आधारे आपला युक्तीवाद केला आणि स्पष्ट केले की, मयत रमाबाई माधवराव सावंत हिच्या पश्चात तिच्या नावे असलेले वीजेचे कनेक्शन वितरण कंपनीने नियमाचे उल्लंघन करून मीटर क्र. ११७१ व ११७२ आणि मीटर क्र. २५७२ बाबत मूळ जागेपासून मीटर स्थलांतर करणे आणि वारस हक्क शाबीत होण्यापूर्वीच घरगुती वापराचे मीटर आर. २५७२ दिलीप शंकर तावडे यांच्या नावाने करण्यात आले असून कायदेशीर बाबीची पूर्तता न करता मंडळाच्या संबंधीत कार्यालयाने बेकायदेशीर कृत्य केल्याचा आरोपही केला. आपल्या तक्रारीच्या आणि युक्तीवादानुसार आवश्यक ती कागदपत्रेही ११.०८.०६ च्या पत्रासोबत दाखल करण्यात आली. श्री. सावंत यांनी दाखल केलेल्या ११.०८.०६ च्या पत्राची प्रत विरूध्द पक्षकार विभागीय कार्यालय आणि उपकार्यकारी अभियंता शहर विभाग यांना देण्यात आली. वितरण कंपनीच्या वतीने कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय श्री. एस्. जी. ढाकरे आणि उपकार्यकारी शहर विभाग यांच्या वतीने सहाय्यक लेखापाल श्री. एच्. बी. जाधव उपस्थित होते. उभयतानी यापूर्वी दाखल केलेले पत्र २५.०७.०६ च्या आधारे आपला युक्तीवाद केला. तथापि, तक्रारीच्या अनुषंगाने कोणताही नवीन पुरावा किंवा संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यात आली नाहीत. सुनावणी चालू असतांना उभयतांना विचारणा करण्यात आली असता ११.०८.०६ च्या पत्राबाबतची कोणतीही माहिती दाखल करणार नसल्याचे सांगण्यात आले. वितरण कंपनीच्या म्हणण्यानुसार कोणत्याही नियमाचे किंवा कायदयातील तरतुदीतील उल्लंघन करण्यात आले नसून अद्यापही वीज कनेक्शन क्र. ११७१ आणि ११७२ वीज वापराचे बील मयत रमाबाई सावंत या नावानेच काढली जातात. तथापि, घरगुती कनेक्सन आर २५७२ हे दिलीप शंकर तावडे यांच्या नावाने करण्यात आले असून वीज वापराचे बीलही दिलीप शंकर तावडे याच नावाने दिली जातात. वितरण कंपनीच्या म्हणण्यानुसार मीटर

क्र. २५७२ हा घर नं. ३४११ मध्ये दि. ११.०७.७९ रोजी देण्यात आलेला असून सदर मीटर दिलीप शंकर तावडे यांचे नावे आहे. मयत रमाबाई सावंत हिच्या नावाचा मीटर एकाच घर नं. मध्ये ११.०७.७९ रोजी दिलीप शंकर तावडे यांच्या नावे कसा होऊ शकला? यांचा खुलासा कंपनीचे प्रतिनिधी करू शकले नाहीत. तथापि, मयत ग्राहकाच्या बाबतीत त्याच्या वारसाने प्रस्ताव दाखल केल्यास सप्लाय कोडमधील नियमावली आणि वीज अधिनियमाच्या आधारे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर संबंधीत वारसाच्या नावे प्रस्ताव आल्यानंतर हया नावात बदल केला जाते असे स्पष्ट करण्यात आले. वितरण कंपनीने खुलासा केल्यानुसार संबंधीत कनेक्शनबाबतची नेमकी वस्तुस्थिती शाखा अभियंता सांगू शकतील आणि याबाबतचा खुलासा नसल्याचे सांगण्यात येऊन संबंधीत मीटर २५७२ बाबत ३० ऑगस्ट पर्यंत कगदपत्रे किंवा आवश्यक खुलासा करण्यात येईल असे सांगण्यात आले असता वितरण कंपनीस ३० ऑगस्ट ०६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दाखल करण्यात आलेल्या माहितीनुसार ग्राहक क्र. ११७१ या शेती पंपाचा वापर कूळ नागवेकर करत असल्याचे सांगण्यात आले. उपलब्ध माहितीनुसार दिलीप शंकर तावडे यांनी एजी ११७१ या शेतीपंपाचा वापर चालू केला असल्यामुळे तक्रारीस सुरुवात झालेली दिसले आहे. मयत रमाबाई सावंत हिच्या जागेतील कूळ विष्णु सितारामा नागवेकर यांनी त्यांचे हक्कासंबंधीचे वठमुखत्यारपत्र सुभाष वामनराव सावंत यांना दिलेले असल्यामुळे श्री. सावंत यांनी शाखा अभियंता, उपकार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात संबंधीत तक्रार आणि पत्रव्यवहार केला असून या पत्रव्यवहाराच्या संपूर्ण प्रती मंचाकडे उपलब्ध केल्या आहेत. एजी ११७१ या कनेक्शन संबंधात वितरण कंपनीचा जावक क्र. १८६७ दि. २५.०५.०५ पत्रानुसार ३०.०५.०५ रोजी या कनेक्शनच्या हक्कासंबंधीत कागदपत्रके पुरविण्यात आली असून संबंधीत प्रस्ताव आज अखेरपर्यंत प्रलंबित आहे. कारण दिलीप शंकर तावडे यांचेविरूध्द (वारसा हक्काबाबत दावा केलेली व्यक्ती) दिवाणी न्यायालयात दावा क्र. २०४/२००३ दाखल झाला असून तो प्रलंबित आहे. प्रत्यक्ष सुनावणी कालावधीत उभय बाजूनी याबाबत वस्तुस्थिती सांगून निर्णयाबाबत कालावधीकरीता असमर्थता व्यक्त केली. उभय बाजूचा युक्तीवाद, दाखल करण्यात आलेली कागदपत्रे पाहता घेण्यात आलेल्या हरकती या मीटरच्या स्थलांतराबाबत आणि मीटरच्या हक्काबाबतच्या नाव बदलाबाबत आहेत. वारसाहक्क प्रकरण सन्माननीय कोर्टात गेला असल्याने याबाबत अंतीम निर्णय होऊ शकला नाही.

सदर तक्रार प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर उपकार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र. ४४५४ दि. २९.०८.०६ दाखल करण्यात आले असून पत्रामध्ये सुनावणी कालावधी दिलीप शंकर तावडे यांच्या नावे असलेले वीज कनेक्शन आर २५७२ बाबत स्पष्ट करण्यात आले आहे की या कार्यालयाच्या रेकॉर्डमध्ये सदर कागदपत्राची पहाणी केली असता ते उपलब्ध नाहीत आणि त्यामुळे मंचास देता येत नाही. तथापि, याच कार्यालयाकडून संबंधीत ग्राहक दिलीप शंकर तावडे ग्राहक क्र. २१०००१०००२५७२३ याचे व्यक्तीगत खाते उतारा सप्टेंबर १९९९ ते जुलै २००६ अखेर पर्यंत देण्यात आला असून संबंधीत ग्राहकाचा पत्ता ३४११ मुरूगवाडा, रत्नागिरी असा आहे. यासोबतच संबंधीत कार्यालयाने Register of Service connection बाबत एफ्१ रजिस्टरचा उतारा जोडला असून एफ्१ रजिस्टरमधील नोंदीनुसार संबंधीत ग्राहकाच्या पत्त्याच्या ठिकाणी घर क्र. नसून केवळ वीर सावरकर चौक एवढाच उल्लेख आहे. संबंधीत कनेक्शनबाबतीत रक्कम दि. २७.११.७८ रोजी भरण्यात आलेली दिसते आणि सर्व्हिस कनेक्शन ११.०७.७९ रोजी दिल्याचे दिसून आले आहे. याच रजिस्टरवरील नोंदीनुसार रिमार्क कॉलममध्ये दिलीप शंकर तावडे यांच्यानावासमोर Old Connection असाही उल्लेख आहे. तथापि सादर करण्यात आलेला तपशील आणि वीज बिलावरून ग्राहकाचा पत्ता घर क्र. ३४११ मुरूगवाडा असाच आहे. प्रचलित नियमानुसार कोणताही मीटर स्थलांतर करताना जी नियमावली पाळावी लागते उदा. संबंधीत ग्राहकाचा अर्ज, सेक्शन ऑफीसची संमती या स्थलांतर कामाचे एस्टिमेट आणि टेस्ट रिपोर्ट इ. या प्रकरणात दाखल करण्यात आलेला नाही. तसेच संबंधीत कार्यालयाच्या पत्रावरून रेकॉर्ड उपलब्ध होत नसल्याने दाखल करण्यात आलेल्या पुराव्यानुसार असे स्पष्ट होत आहे की, मीटर क्र. आर. २५७२ दिलीप शंकर तावडे यांच्या नावाचाच असून त्यांचा घर क्र. ३४११ पडलेला आहे. उपविभागीय कार्यालयाने दिलेला व्यक्तीगत खातेउतारा तसेच एफ् १ रजिस्टरचा तपशील पहाता ग्राहकाच्या पत्त्यामध्ये तफावत असून याचा उल्लेख Old Connection असा झालेला आहे. संबंधीत कार्यालयाने या मीटरच्या

स्थलांतराकरीता नेमकी कोणती कार्यपध्दती वापरली हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे संबंधीत शाखा कार्यालय या कृतीस जबाबदार ठरते.

मयत ग्राहक रमाबाई माधवराव सावंत यांच्या नावे शेतीपंप कनेक्शन ग्राहक क्र. ११७१ आणि घरगुती वापराचे कनेक्शन आर ११७२ आहे. या दोन्ही मीटरचा ग्राहक रमाबाई माधवराव सावंत १९९५ साली मयत झाले असता दरम्यानच्या काळात संबंधीत ग्राहकाचे वारसदार किंवा वितरण कंपनीचे शाखा कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालय यांच्यापैकी या घटनेची नोंद कोणीही २००५ पर्यंत घेतली नसून सुभाष वामनराव सावंत यांनी १७.०५.०५ रोजी वरील माहिती वितरण कंपनीस कळविलेली दिसते. संबंधीत सुभाष वामनराव सावंत यांनी २२.०७.०५ रोजी दिलेल्या अर्जास कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांनी दिलेले उत्तर पत्र क्र. १२१४ दि. ११ ऑगस्ट २००५ तपासले असता स्पष्ट होते की, ११७१ आणि ११७२ या संबंधात माहिती दिली असून संबंधीत मीटरच्या स्थलांतराबाबत मात्र स्पष्टपणे खुलासा करण्यात आलेला नाही. संबंधीत पत्रामध्ये घर न. ३४११ याच ठिकाणी मीटर क्र. ११७२ आणि ११७१ असल्याचे नमूद करण्यात आले असून सध्याचे शाखा अभियंता २००३ पूर्वी कार्यरत नसल्याने तत्कालीन शाखा अभियंता देऊ शकतील असे शाखा अभियंत्यांनी सांगितले असून ही माहिती घेणे आवश्यक असल्याने यास अवधी लागणार आहे असे कळविण्यात आले आहे. तक्रार प्रकरणातील मीटर क्र. ११७१ व मीटर क्र. ११७२ आणि दिलीप शंकर तावडे यांच्या नावे असलेले कनेक्शन ग्राहक क्र. २५७२ बाबत संबंधीतची तक्रार सहाय्यक विद्युत निरीक्षक / विद्युत निरीक्षण उपविभाग रत्नागिरी यांच्याकडे २८.०२.०६ रोजी दाखल झाली असून सदर अर्ज मयत रमाबाई माधवराव सावंत वारस हक्काने वारस निश्चित झाले नसताना सुभाष वामनराव सावंत यांचा असून संबंधीत कार्यालयाने या तक्रारीच्या अनुषंगाने आज अखेरपर्यंत कोणतीही कृती केल्याचे आढळून आलेले नाही. याप्रकरणात मयत रमाबाई माधवराव सावंत हिचे वारसदार निश्चित झालेले नाहीत. तसेच वारसा हक्काबाबत सन्माननीय कोर्टा मध्ये दावा दाखल झाला असल्यामुळे(दावा क्र. २०४/२००३)आणि प्रकरण अद्याप प्रलंबित असल्याने वारस या नात्याने संबंधीताचे म्हणणे ग्राहय धरता येणार नाही आणि सन्माननीय कोर्टाचा वारस हक्काबाबत जो निर्णय लागेल त्यानुसार कार्यवाही रास्त ठरणार असल्यामुळे प्रस्तुतच्या विषयावर भाष्य करणे किंवा निष्कर्ष देणे उचित ठरणार नाही. ११७१ आणि ११७२ या मीटर बाबत जे वारसदार ठरतील त्याच्या नावे संबंधीत वीज कनेक्शन त्यांच्या नावे करून देणे व पुरवठा चालू ठेवणे ही जबाबदारी वितरण कंपनीची असून सप्लाय कोड मधील नियमावली १० नुसार नावातील बदल करणे रास्त ठरेल आणि यातील पोटनियम १०.१ ते १०.५ वितरण कंपनीवर बंधनकारक आहेत. मीटर स्थलांतर किंवा नावातील बदल याच नियमानुसार व्हावयास पाहिजे. मयत रमाबाई सावंत यांचे शेतीपंप कनेक्शन कनेक्शन ग्राहक क्र. ११७१ नुसार असून संबंधीत जागेस कुळ वहिवाटदार म्हणून सिताराम लक्ष्मण नागवेकर यांची नोंद हक्काचे पत्रक गाव नमुना ६ नोंदीचा अनुक्रमांक ३५५५ दि. २७.०३.५८ रोजी झालेली असून हक्काचे पत्रक फेरफार क्र. ३५५५ चा उतारा तलाठी झाडगाव यांनी दिलेला असून संबंधीत कुळ नागवेकर यांच्यावतीने वटमुखत्यारपत्रधारक (वटमुखत्यारपत्र २७.०८.०३) यांनी दाखल केलेले आहे. या शेतीपंप कनेक्शनबाबत विष्णू सिताराम नागवेकर यांचा अर्ज १७.०५.०५ रोजी दाखल झाला असता उपविभागीय कार्यालयाने जावक क्र. १८६७ दि. २५.०५.०५ नुसार ज्या कायगदपत्राचा तपशील मागण्यात आला होता तो संबंधीत विष्णू सिताराम नागवेकरच्या करीता वटमुखत्यारपत्रधारक सुभाष वामनराव सावंत यांनी ३१.०५.०५ रोजी उप कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालायात दाखल केला असून संबंधीत कागदपत्राबरोबर वारसा हक्काबाबत दाखल केलेला दावा क्र. २०४/2003 याचीही प्रत देण्यात आलेली आहे. प्रस्तुत मीटरबाबत वारसदार शाबीत झाले नसल्याने वितरण कंपनीने मीटर आणि ग्राहकाच्या नावात कोणताही बदल केलेला नाही आणि ही कृती नियमानुसारच आहे. या मीटरची वीजेच्या वापराबाबत देण्यात येणारी बिले अद्यापही मयत रमाबाई शंकर सावंत यांच्या नावानेच दिली जातात. याचाच अर्थ ग्राहक क्र. २१००१००२५७२३ मीटर आर २५७२ आणि ग्राहक क्र. २१००१००११७२२ मीटर ११७२ मीटरचे स्थलांतर नियमबाहय झाले असून कायदेशीर बाबीचे उल्लघंनही संबंधीत कार्या...कडून झालेले आहे. स्थलांतर बाबतची नियमावली, स्थलांतर करण्याची फी, टेस्ट रिपोर्ट इ. दाखल करण्यात आलेले नाही. उपलब्ध पुरावे आणि कागदपत्राची शहानिशा केली असता मीटरचे स्थलांतर

संबंधीत कर्मचाऱ्याने नियमांना डावलूनच केल्याचे स्पष्ट झाले आहे. वितरण कंपनीने त्या कालावधीतील संबंधीत कर्मचाऱ्यांना जबाबदार धरून योग्य ती कार्यवाही करावी. असे मंचाचे स्पष्ट मत आहे. या तक्रार प्रकरणात २००३ सालापासून पत्र व्यवहारास आणि तक्रारीस सुरूवात झाली असून २००५ पासून संबंधीत विभागाकडे लेखी तक्रार दाखल झालेली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय कार्यालय तसेच संबंधीत विभागीय कार्यालय यांनी वेळोवेळी उत्तरेही पाठविली आहेत. तथापि, प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता तक्रारीचे निराकरण होऊ न शकल्याने वटमुखत्यारपत्रधारक सुभाष वामनराव सावंत यांनी तक्रार अर्ज अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांच्याकडे कर्मचाऱ्याच्या वर्तणुकीबाबतचा तक्रार अर्ज १२.०४.०६ रोजी दाखल केला असता संबंधीत कक्ष मंडल कार्यालयाने आपल्याकडील पत्र क्र. २३३८ दि. ०७.०६.०६ च्या पत्रानुसार कर्मचाऱ्याच्या वर्तणुकीबाबत कळविले असून करण्यात आलेले आरोप फेटाळण्यात आलेले आहेत. अंतर्गत निवारण कक्षाने मीटर कनेक्शनचा विद्युत पुरवठा आणि वारसा हक्काबाबत दिलेला निर्णय उद्भवलेल्या परिस्थितीनुसार योग्य असून मंचही त्याच निष्कर्षाला आलेला आहे. मयत ग्राहकाचे कायदेशीर वारस ठरल्यानंतरच नावातील बदल होऊ शकतो अन्यथा नाही. संबंधीत जागा, त्याच्या वाटण्या त्याचे वारस हा मंचाच्या अखत्यारीतील विषय नाही आणि त्यामुळेच सुभाष सावंत यांनी उपस्थित केलेले यासंबंधातील मुद्दे विचारात घेण्यात आलेले नाहीत. याप्रकरणाची छाननी करता मंचाचा निष्कर्ष असा की, मयत रमाबाई सावंत १९६७ साली मयत झाल्यानंतर तब्बल ३० वर्षामध्ये संबंधीत मीटर रिडर, शाखा कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालय यांच्या कार्यपध्दतीतून वीजेचा पुरवठा चालू असताना याबाबी दुलर्क्षित नको होत्या. किंबहुना संबंधीत कर्मचारी आणि कार्यालयाने आपली जबाबदारी पार पाडल्याचे जाणवलेले नाही, त्यामुळे कर्मचाऱ्याच्या वर्तणुकीविरूध्द झालेली तक्रार रास्त असून कारवाई होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत तक्रार प्रकरणात तक्रारदार आणि विरूध्द पक्षकार यांनी दाखल केलेले पुरावे, सादर करण्यात आलेली कागदपत्रे अन्य तपशील आणि प्रत्यक्ष सुनावणी कालावधीत केलेला युक्तीवाद त्याचप्रमाणे सादर करण्यात आलेले लेखी निवेदन इ. विचारात घेता याप्रकरणी मंच खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. मयत वीज ग्राहक रमाबई माधवराव सावंत याच्या नावे असलेले वीज कनेक्शन ग्राहक क्र. २१००१००११७२२ / ~~आणि~~ घरगुती मीटर क्र. ११७२ यांचे झालेले स्थलांतर (Shifting)नियमबाहय असून कायद्यातील तरतुदी आणि नियमावलीचा भंग करणारे असून स्थलांतर झालेल्या कालावधीतील संबधीत कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येत असून महावितरण कंपनीने याची चौकशी करून सेवेत हलगर्जीपणा आणि कर्तव्यात कसूर केल्याबद्दल संबंधीतावर योग्य ती कारवाई करावी आणि कारवाईचा अहवाल मंचाकडे आदेश प्राप्त झाल्यापासून ४० दिवसांचे आत सादर करावा.

२. मयत वीज ग्राहक रमाबई माधवराव सावंत यांचे कायदेशीर वारस निश्चित झाले नसल्याने आणि त्यासंबंधातील वाद/तंटा सिव्हील सुट क्र. २०४/२००३ दिवाणी न्यायालयात प्रलंबित असल्याने न्यायालयाच्या निर्णयानुसार जे कायदेशीर वारस ठरतील त्या वारसाच्या नावातील बदल सप्लाय कोडमधील नियमावली क्र. १० च्या अधीन राहून करण्यात यावा. बील मयताच्या नावे देण्यात येत असल्याने व त्याचा नियमीत भरणा होत असल्याने वीजेचा पुरवठा आहे त्या स्थितीत चालू ठेवण्यात यावा आणि कोर्टाचा निर्णय लागेपर्यंत कोणताही बदल करण्यात येऊ नये. यासंबंधातील तक्रारदाराने उपस्थित केलेले सर्व आक्षेप/हरकती फेटाळण्यात येत आहेत.

३. मीटर क्र. २५७२ हा ११.०७.७९ पासून दिलीप शंकर तावडे (ग्राहक क्र. २१००१००२५७२३) यांच्यानावे असल्याने यासंबंधातील उपस्थित केलेल्या सर्व हरकती फेटाळण्यात येत असून या कनेक्शनबाबतही झालेले मीटरचे स्थलांतर नियमबाह्य आहे. संबंधीत ग्राहकाचा नेमका पत्ता आणि ज्याठिकाणी मीटर आहे त्याबाबीची खातरजमा करून वीज वापरासंबंधीची बिले ज्याठिकाणी मीटर बसविण्यात आला आहे त्याठिकाणी दयावेत. मीटर स्थलांतराबाबत जबाबदार कर्मचाऱ्यावर उचित कारवाई करून त्याचा अहवाल ४० दिवसाच्या आत मंचाकडे दाखल करण्यात यावा.

४. यापुढे मीटरचे स्थलांतर, नावातील बदल आणि तत्सम बदलाबाबत सप्लाय कोडमधील नियमावलीचे पालन केले जावे आणि पुढील कोणतीही कार्यवाही यानियमाच्या अधीन राहून केली जावी. संबंधीत ग्राहकाकडून मीटर स्थलांतराची फी व अनुषंगिक खर्च वसूल करण्यात यावा.

५. या आदेशाविरूध्द तक्रारदारास अपील करावयाचे असल्यास खालील नमूद केलेल्या पत्त्यावर आदेश मिळाल्यापासून ६० दिवसाच्या आत अपील दाखल करता येईल.

पत्ता :
सचिव लोकपाल – (ओम्बुड्समन)
महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
६०६/६०८ केशव बिल्डींग, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
मुंबई – ४०००५१
फोन नं. ०२२२६५१३९६५

६. तक्रारदाराने संबंधीत जागा त्याची वाटणी, त्याचा वापर आणि त्याच्या अनुषंगाने असणारा अन्य तपशील याबाबतीत उपस्थित केलेले विविध मुद्दे / हरकती याचा वीजपुरवठयाशी काहीही संबंध नसल्याने तो नाकारण्यात येत असून तक्रारदार कोणत्याही खर्चास किंवा नुकसान भरपाईस पात्र ठरत नाहीत.

दिनांक : ०४.०९.०६

ठिकाण : रत्नागिरी

श्री. एस्. आर. खंडारे
अध्यक्ष, सचीव व सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच
कोकण परिमंडल, रत्नागिरी

श्री. एम्. ए. कुलकर्णी
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच
कोकण परिमंडल, रत्नागिरी